आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

७ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी राज्यभरात विविध पक्षांचा प्रचार सुरू, ठिकठिकाणी प्रचारसभांचं आयोजन
- विधानसभेच्या प्रचारासाठी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांच्या राज्यात प्रचारसभा, १० नोव्हेंबरला महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध होणार
- विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा प्रसिद्ध
- निवडणूक आचारसंहितेच्या काळात उत्पादन शुल्क विभागाची राज्याच्या विविध भागात छापेमारी

  **आणि**

- भारतीय शेअर बाजारात कालच्या तेजीनंतर आज पुन्हा घसरण

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोमाने सुरु आहे. राज्यातल्या दिग्गज नेत्यांसह इतर राज्यातल्या नेत्यांच्या देखील ठिकठिकाणी सभा होत आहेत. औरंगाबाद मध्य मतदार संघात महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांनी आज मित्र पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत मतदारसंघात पदयात्रा काढली. महायुतीचे औरंगाबाद पूर्व मतदारसंघातले उमेदवार अतुल सावे यांनी आज लोकांशी संवाद साधला. वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी आज कन्नड मतदारसंघाचे पक्षाचे उमेदवार अयाज मकबूल शहा यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दोन प्रचार सभा होणार आहेत.

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी येत्या १३ ते १८ नोव्हेंबर या काळात काँग्रेस नेत्यांच्या प्रचारसभा होणार आहेत. काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला आणि काँग्रेसच्या प्रचार समितीचे अध्यक्ष चंद्रकांत हांडोरे यांच्या नेतृत्वाखाली  काँग्रेसच्या प्रचार समितीची बैठक आज झाली, त्यावेळी चेन्नीथला यांनी ही माहिती दिली.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे १३ ते १८ नोव्हेंबर या काळात राज्याच्या दौऱ्यावर आहेत. जेष्ठ नेते राहुल गांधींच्या सभा १२,१४ आणि १६ या तारखांना तर प्रियांका गांधींच्या सभा १३,१६ आणि १७ ला होणार आहेत, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या तर तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी  यांच्याही सभा होणार असल्याचं चेन्नीथला यांनी या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

महाविकास आघाडीचा जाहिरनामा १० नोव्हेंबरला प्रसिद्ध केला जाईल अशी माहिती देताना चेन्नीथला यांनी कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसने ज्या गॅरंटी दिल्या त्याची अंमलबजावणी सुरु आहे.  गॅरंटी  जाहीर करताना आर्थिक तरतूद कशी केली जाईल यावर सखोल चर्चा आणि अभ्यास करुनच त्या जाहीर केल्या आहेत, असंही रमेश चेन्नीथला यांनी सांगितलं. काँग्रेसच्या ज्या उमेदवारांनी महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरोधातले अर्ज मागे घेतले नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांना ६ वर्षांसाठी काँग्रेसमधून निलंबित करण्यात आले आहे अशी माहिती त्यांनी दिली.

काँग्रेसच्या गॅरंटीविरोधात चुकीच्या आणि अफवा पसरवणाऱ्या खोट्या जाहिराती भाजपाने वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्या आहेत. या विरुद्ध काँग्रेस निवडणूक आयोगाकडे दाद मागणार आहे असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज मुंबई इथून आपला वचननामा प्रसिद्ध केला. पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे इथल्या निवासस्थानी या वचननाम्याचं प्रकाशन झालं. संस्कार, अन्नसुरक्षा, महिला, आरोग्य, शिक्षण, पेन्शन, शेतकरी, वंचित समूह, उद्योग तसंच मुंबईच्या विकासासाठी असलेलं धोरण या प्रमुख घटकावर आधारीत हा वचननामा आहे. हा आपल्या पक्षाचा वचननामा असून महाविकास आघाडीचा सविस्तर जाहीरनामा लवकरच जाहीर होईल, असं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष देसाई, आमदार अनिल परब यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर आज दुपारी उद्धव ठाकरे यांनी अमरावती जिल्ह्यातले महाविकास आघाडीचे उमेदवार गजानन लवटे यांच्यासाठी दर्यापूर इथे प्रचारसभा घेतली. निवडणुका आल्यावर या सरकारनं शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी योजना जाहीर केल्या. मग अडीच वर्षे काय केलं असा सवाल करत उद्धव ठाकरे यांनी या प्रचारसभेत महायुती सरकावर टीका केली.

**<><><><><>**

केंद्र आणि राज्य सरकारचं डबल इंजिन महाराष्ट्राचा विकास करत आहे. महाराष्ट्राचा विकास पाहून विरोधकांच्या पोटात दुखलं आणि त्यांनी खटले दाखल केले. परंतु याचा फटका आपल्यालाच बसेल हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर आता हे विरोधक महिलांसाठी योजना जाहीर करत असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. अकोला जिल्ह्यात बाळापूर तालुक्यात वाडेगाव इथं महायुतीच्या प्रचार सभेत  बोलत होते.

राज्यात महायुतीचं सरकार पुन्हा येईल असा विश्वास शिंदे व्यक्त  करत  सत्तेत आल्यानंतर लाडक्या बहिणींच्या खात्यात दर महिन्याला दोन हजार १०० रुपये जमा केले जातील, अशी घोषणा केली.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर असून आज ते नागपूर इथे पूर्व नागपूर मतदारसंघाचे उमेदवार दुनेश्वर पेठे यांच्या प्रचारसभेत सहभागी झाले. राज्यातल्या जनतेला परिवर्तन हवं आहे, याची आम्हाला जाणीव असून, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असं ते यावेळी म्हणाले.

महाराष्ट्रातून उद्योगांचं पलायन झालं असून देशाचे प्रधानमंत्री हे एका राज्याचे, नसून ते सर्व देशाचे असायला हवेत, असं ते यावेळी म्हणाले, आणि मतदारांना महाविकास आघाडीच्या पाच गॅरंटीची माहिती दिली.

जातीनिहाय जनगणनेची मागणी आम्ही तीन वर्षापासून करत असून, त्या माहितीच्या  आधारावर आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची स्थिती निर्माण होऊ शकते, असं पवार या सभेत म्हणाले.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अकोला आणि वाशीम जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत उत्पादन शुल्क विभागाची राज्याच्या विविध भागात छापेमारी सुरु आहे.

उत्पादनशुल्क विभागानं **धुळे** जिल्ह्यात विविध ठिकाणी केलेल्या छापेमारीत अवैध मद्यविक्री, वाहतूक प्रकरणी आतापर्यंत ७६ गुन्हे दाखल केले असून, ९३ लाख २ हजार ९७८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी ५८ संशयितांना अटक करण्यात आली आहे.

**ठाणे** जिल्ह्यात घोडबंदर मार्गावर राज्य उत्पादनशुल्क विभागानं आज दुपारी केलेल्या कारवाईत गावठी दारूसह एकूण ३ लाख ३६ हजार १८०रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली असून, पुढला तपास सुरु आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर **जळगाव** जिल्ह्यात बेंडाळे चौकात पोलिसांनी केलेल्या तपासणीत एका वाहनात अडीच कोटी रुपयांची रोकड आढळून आली. तपासणीत ही रक्कम वैध असल्याचं समोर आल्यावर ती संबंधित व्यापाऱ्याला परत करण्यात आली.

**<><><><><>**

अमरावतीमध्ये उभारण्यात आलेल्या टेक्सटाईल पार्कमुळे ५० हजार लोकांना रोजगार मिळाला असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमरावतीत आणखी एक पार्क तयार करण्याची घोषणा केली असून त्यामुळे दहा लाख लोकांना रोजगार मिळणार असल्याचं भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज पांढरकवडा इथं भाजपा उमेदवार राजू तोडसाम यांच्या प्रचारसभेत बोलत होते. आमचं सरकार

शेतकऱ्यांचं सरकार असून त्यामुळे आम्ही शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आणल्या आहेत. शेतकऱ्यांचं वीजबिल माफ करण्यात आलं आहे असंही ते म्हणाले.

त्यानंतर फडणवीस यांनी यवतमाळच्याच फुलसावंगी इथे भाजपा उमेदवार किसन वानखेडे यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. या सभेत फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली. राहुल गांधी यांनी संविधान बचाव रॅली करून संविधानाचा अपमान केला, कारण त्यावेळी त्यांच्या हातात असलेलं पुस्तक हे संविधानाची प्रत नव्हती, अशी टीका फडणवीस यांनी या प्रचारसभेत केली.

**<><><><>**

भाजपा शेतकरी विरोधी असून काल भाजपा नेत्याने वणीमध्ये ज्या पद्धतीनं कुणबी समाजाविषयी अपशब्द वापरले ते चुकीचं आहे, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. भाजपाला आम्हाला दोन कोटी तरुणांना नोकरी देण्याचे जे आश्वासन दिले होते त्याची आठवण करुन द्यावी लागेल असंही ते म्हणाले. भाजपा राहुल गांधी यांना घाबरलेला असून त्यांच्या मार्गात आडकाठी करण्याचा प्रयत्न करत असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. राहुल गांधींना खोट्या केसेसमध्ये अडकवण्याचा प्रयत्न झाल्यास भाजपाला त्याचे उत्तर द्यावे लागेल असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

महायुती सरकारने आपल्या लाडक्या बहिणीसाठी पंधराशे रुपये दिले. ही रक्कम पुढे वाढवणार असून घरोघरी लखपती कुटुंबं होतील असं आश्वासन भाजपाचे नेते ज्योतिरादित्य सिंदीया यांनी आज अहिल्यानगर इथं दिलं. कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघामधल्या राशीन इथं आयोजित जाहीर सभेत तो बोलत होते.

**<><><><><>**

शेअर बाजारातल्या कालच्या तेजीला आज लगाम बसला. अमेरिकेतल्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणूक निकालानंतर शेअर बाजारात काल तेजीचा जोर होता, मात्र गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्यामुळे आज तो ओसरला. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज ८३६ अंकांनी घसरून ७९ हजार ५४२ अंकांवर बंद झाला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २८५ अंकांची घसरण नोंदवून २४ हजार १९९ अंकांवर बंद झाला.